**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नासिक**
**अंतर्गत संज्ञापन पत्र**

**प्रेषक :** प्रा.विजयकुमार पाईकराव **विषय :**मी व माझे सहकारीवृंद निबंधलेखन स्पर्धा इतिवृत्त अहवाल...

**प्रति** : मा. कुलगुरू **दिनांक**: १०/१०/२०२५

उद्दिष्टे: माहितीसाठी/ विचारार्थ/मंजुरीसाठी/सूचना/निर्णयार्थ/कृतीसाठी/अवलोकनार्थ फिरविणे

आपल्या विद्यापीठातील व अभ्यासकेंद्रावरील सहकारीवृन्दासाठी आयोजित निबंधलेखन स्पर्धा इतिवृत्त अहवाल मान्यतेसाठी सविनय सादर.

**!!इतिवृत्त !!**

आपल्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या मुख्यालयातील व सर्व अभ्यासकेंद्रावरील सहकारीवृन्दासाठी कुलगुरू मा. प्रा. संजीव सोनवणे व प्र. कुलगुरू मा. प्रा. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या संकल्पनेतून विद्यापीठाचे संपुर्ण शैक्षणिक कामकाज आधिक प्रभावी व्हावे या उद्देशाने. **"वाचा आणि शिका' प्रकल्पांतर्गत"** विद्यापीठाच्या सेवांतर्गत प्रशिक्षण कक्ष व संवाद पत्रिकेच्यावतीने. विद्यापीठाच्या मुख्यालयातील व सर्व अभ्यासकेंद्रावरील अभ्यासकेंद्र संचालक, समन्वयक, संमंत्रक आणि केंद्रसहाय्यक यांच्यासाठी "**मी व माझे सहकारीवृंद"** या विषयवार निबंध लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती त्याचा तपशील पुढील प्रमाणे.

१. विषय : मी व माझे सहकारीवृंद
२. शब्द मर्यादा १००० ते २५०० हस्तलिखित स्वरुपात
३. शेवटची तारीख १०/०३/२०२५
४. उत्कृष्ट निबंधास स्तर निहाय प्रथम, द्वितिय व तृतीय पारितोषिके ग्रंथ स्वरुपात देण्यात येतील.
५. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.
६. गुणवत्ता सहभाग प्रमाणपत्रे सर्वांना देण्यात येतील.
७. भाषा : मराठी

मा. कुलगुरु कार्यालय
य. च. म. मुक्त विद्यापीठ,
अंतर्गत आवक क्र.:१८८१/२८९१
दि. १०/१०/२०२५

८.निबंधासाठी मुद्दे :- शीर्षक, प्रस्तावना, पूर्वतयारी, उत्तम कृतीचा अध्ययनार्थीला झालेला उपयोग, आकडेवारी, अध्ययनार्थी प्रवेशवृद्धी, अध्ययनार्थी स्वयं अध्ययनास उपयोग, संमंत्रणसत्र उपस्थितीत वाढ, अंतर्गत प्रात्यक्षिक कार्य, स्वाध्याय, गृहपाठ, प्रकल्प, अंतिम लेखी परीक्षा इ. च्या गुणात्मक विकासासाठी झालेले उपयोजन. इ.

स्पर्धकांनी लेखनातील आशय पुरावे असल्यास ते सोबत पाठवावेत. (उदा. फोटो, अहवाल, इतिवृत्त, तक्ता इ.) लेखनाच्या शब्द मर्यादेस बंधन नाही सविस्तर लिहावे. उत्तम लेखांना विद्यापीठाच्या संवाद पत्रिकेत प्रसिद्धी दिली जाईल. तसेच यथावकाश अध्ययनार्थीसाठी उपयुक्त ग्रंथ स्वरुपात व ऑनलाईन स्वरुपात संकेतस्थळावर प्रसिद्धी दिली जाईल.

तज्ज्ञ परीक्षक प्रा. दिलीप धोंडगे यांच्या अभिप्रायानुसार निबंध लेख किमान गुंणवतेचे असल्यामुळे सर्व विजेत्यांना टपालाद्वारे केवळ प्रमाण पत्रे व ग्रंथ भेट द्यावेत, अशी शिफारस केली. या स्पर्धेतील विजेते सहकारीवृंद पुढील प्रमाणे.

**प्रथम क्रमाक :** डॉ सुधर्म हंडे. समन्वयक,आर.आर. लाहोटी महाविद्यालय अभ्यासकेंद्र मोर्शी जि. अमरावती

**द्वितीय क्रमांक :** डॉ. राजेंद्र बगाटे. शैक्षणिक समन्वयक, बहुविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा.


**तृतीय क्रमांक :** डॉ. शैलजा हासबे वरिष्ठ शैक्षणिक संयोजक, नांदेड विभागीय केंद्र व डॉ. पूनम वाघ विद्यार्थी सेवा विभाग

**उत्तेजनार्थ :** १) प्रा. मिलिंद देशपांडे, संगणकशास्त्र विद्याशाखा
२)प्रा. प्रकाश खानाले,संगणकशास्त्र विद्याशाखा
३) श्रीम.मीनल गोबरे. सहायक, आर. आर. लाहोटी महाविद्यालय अभ्यासकेंद्र, मोर्शी जि. अमरावती
४) प्रा.सविता पाटील, शैक्षणिक संयोजक, कोल्हापूर विभागीय केंद्र

विद्यापीठाचे कुलगुरू मा. प्रा. संजीव सोनावणे व प्र-कुलगुरू डॉ. जोगेन्द्रसिंह बिसेन, विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्या डॉ. संजीवनी महाले, कुलसचिव श्री. दिलीप भरड, वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, परीक्षा नियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील यांच्यासह सर्व विद्याशाखा संचालक व शिक्षक विभागीय केंद्र संचालक व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्वांचे अभिनंदन केले. स्पर्धा समन्वयक म्हणून सेवांतर्गत प्रशिक्षण कक्षाचे प्रमुख प्रा. विजयकुमार

पाईकराव यांनी कार्यानंद केला. सदर उपक्रम यस्वश्वीतेसाठी सहायक श्री. राहुल विश्वनाथ पगारे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## निबंध लेखन स्पर्धेचे कुलगुरू मान्यता पत्र.



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
नॅक मानांकित 'अ' श्रेणी NAAC Accredited 'A' Grade
अंतर्गत संज्ञापन पत्र / Internal Communication Sheet


प्रेषक : प्रा. विजयकुमार पाईकराव विषय : मी व माझे सहकारीवृंद निबंध लेखन स्पर्धेबाबत..
प्रति : मा.कुलगुरू दिनांक : १७/०२/२०२५

कृपया आपल्या विद्यापीठाच्या सर्व सहकारी सहकारीवृंदासाठी "**मी व माझे सहकारीवृंद**,, या विषयावर निबंध लेखन स्पर्धा आयोजित करण्याचा मानस आहे. त्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे. त्यास परवानगी द्यावी हीविनंती आदर व आभारा सह !!!
१) विषय : मी व माझे सहकारीवृंद
२) शब्द मर्यादा १००० ते २५०० हस्तलिखित स्वरुपात
३) शेवटची तारीख १०/०३/२०२५
४) उत्कृष्ट निबंधास स्तर निहाय प्रथम, द्वितिय व तृतीय पारितोषिके ग्रंथ स्वरुपात देण्यात येतील.
५) परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.
६) गुणवत्ता सहभाग प्रमाणपत्रे सर्वांना देण्यात येतील.
७) भाषा : मराठी

प्रा. विजयकुमार पाईकराव
प्रमुख ,सेवांतर्गत प्रशिक्षण कक्ष

मा. कुलगुरू 18/2/25

मा. कुलगुरू कार्यालय
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
अंतर्गत आवक क्र.: VC1517
दि. 18 / 2 /2025



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
अंतर्गत संज्ञापन पत्र

प्रेषक : प्रा.विजयकुमार पाईकराव विषय : निबंध लेखन मुदत वाढबाबत..
प्रति : मा.कुलगुरू दिनांक : २४/०३/२०२५

उद्दिष्टे: माहितीसाठी/ विचारार्थ/मंजुरीसाठी/सूचना/निर्णयार्थ/कृतीसाठी/अवलोकनार्थ फिरविणे


कृपया मा. कुलगुरू यांच्या मार्गदर्शनानुसार आपल्या विद्यापीठाच्या सर्व **शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी , अधिकारी , सहकारीवृंदासाठी** निबंध लेखन स्पर्धा आयोजित केली होती. तरी बऱ्याच सहकारीवृंदाना वेळेत आपले निबंध लिहिता आले नाहीत असे त्यांनी प्रत्येक्ष व भ्रमणध्वनीवर कळवले आहे.या सर्वांनसाठी एक सुसंधी म्हणून **दि. ०२ एप्रिल २०२५** पर्यंत आपण मुदतवाढ देण्यास परवानगी द्यावी ही विनंती आदर व आभारासह !
विषय : मी आणि माझे सहकारीवृंद।

प्रा. विजयकुमार पाईकराव,
प्रमुख,सेवांतर्गत प्रशिक्षण कक्ष

मा.कुलगुरू 24/3/25

मा. कुलगुरू कार्यालय
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
अंतर्गत आवक क्र.: VC/869
दि. 24/ 3 /2025

## परीक्षक मान्यता पत्र :



जा.क्र. ९५२

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
नॅक मानांकित 'अ' श्रेणी NAAC Accredited 'A' Grade
अंतर्गत संज्ञापन पत्र / Internal Communication Sheet

प्रेषक : प्रा. विजयकुमार पाईकराव विषय : मी व माझे सहकारीवृंद निबंध लेखन स्पर्धा परीक्षकाबाबत..
प्रति : मा.कुलगुरू दिनांक : २६/०४/२०२५

कृपया आपल्या विद्यापीठाच्या सर्व सहकारी सहकारीवृंदासाठी "**मी व माझे सहकारीवृंद**,, या विषयावर निबंध लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्या नुसार निबंध लेख प्राप्त झाले असून त्याच्या परीक्षणासाठी खालील परीक्षकांना किंवा आपल्या मार्गदर्शनानुसार अन्य परीक्षकांना मान्यता द्यावी, ही विनंती. आदर व आभारासह !!!
१) डॉ. दिलीप धोंडगे, समन्वयक कुसुमाग्रज अध्यासन
२) श्री. महेंद्र बनसोडे, जनसंपर्क अधिकारी
३)

प्रा. विजयकुमार पाईकराव
प्रमुख,
महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन

मा. कुलगुरू

मा. कुलगुरू कार्यालय
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
अंतर्गत आवक क्र.: VC/1180
दि. 26/ 4 /2025

# वृत्तपत्र प्रसिद्धी

सकाळ YCMOU PRO SK S4 31.05.25

## मुक्त विद्यापीठाच्या निबंध स्पर्धेत डॉ. हंडे प्रथम



नाशिक, ता. ३० : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील अध्यापक व सहकारी कर्मचाऱ्यांसाठी विद्यापीठाच्या सेवांतर्गत प्रशिक्षण कक्षातर्फे निबंध स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेचा निकाल जाहीर केला आहे. अमरावती विभागीय केंद्राअंतर्गत मोशी येथील आर. आर. लाहोटी महाविद्यालयाचे अभ्यासकेंद्र समन्वयक डॉ. सुधर्म हंडे यांनी प्रथम क्रमांक मिळविला आहे.

'कृपया वाचा आणि शिका' प्रकल्पांतर्गत 'मी आणि माझे सहकारीवृंद' या विषयावरील निबंध स्पर्धा कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली घेतली होती. विद्यापीठातील कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख प्रा. दिलीप धोंडगे यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. स्पर्धेत द्वितीय डॉ. राजेंद्र बगाटे (बहुविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा, विद्यापीठ मुख्यालय), तृतीय क्रमांक (विभागून) डॉ. शैलजा हासबे (वरिष्ठ शैक्षणिक संयोजक, नांदेड विभागीय केंद्र) आणि डॉ. पूनम वाघ (विद्यार्थी सेवा विभाग, विद्यापीठ मुख्यालय) यांनी मिळविला. उत्तेजनार्थ मिलिंद देशपांडे, प्रकाश खनाळे (दोघेही संगणकशास्त्र विद्याशाखा, विद्यापीठ मुख्यालय), मीनल गोबरे (सहायक, आर. आर. लाहोटी महाविद्यालय अभ्यासकेंद्र, मोशी, अमरावती आणि सविता पाटील (शैक्षणिक संयोजक, कोल्हापूर विभागीय केंद्र) यांना जाहीर झाला. विजेत्या निबंध लेखकांना प्रमाणपत्रे व ग्रंथ पारितोषिके टपालाद्वारे पाठविण्यात येणार आहेत. स्पर्धा समन्वयक म्हणून सेवांतर्गत प्रशिक्षण कक्षाचे प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी काम पाहिले.

Nashik, Nashik-Today
31/05/2025 Page No. 4

YCMOU PRO BHR P4 28.05.25

## मुक्त विद्यापीठाच्या 'मी आणि माझे सहकारी वृंद' निबंध स्पर्धेचा निकाल घोषित



नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील सर्व अध्यापकवृंद व सहकारी कर्मचाऱ्यांसाठी विद्यापीठाच्या सेवांतर्गत प्रशिक्षण कक्षाच्या वतीने 'कृपया वाचा आणि शिका' प्रकल्पांतर्गत 'मी आणि माझे सहकारीवृंद' या विषयावर निबंध स्पर्धा झाल्या.

विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या स्पर्धेत अमरावती विभागीय केंद्राअंतर्गत असणाऱ्या मोशी येथील आर. आर. लाहोटी महाविद्यालयाचे अभ्यासकेंद्र समन्वयक डॉ. सुधर्म हंडे यांनी प्रथम क्रमांक मिळविला.

विद्यापीठातील कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख प्रा. दिलीप धोंडगे यांनी या स्पर्धेचे परीक्षण केले. त्यांनी गुणवत्तेनुसार निवडलेल्या उर्वरित विजेत्यांची नावे पुढीलप्रमाणे - द्वितीय क्रमांक - डॉ. राजेंद्र बगाटे (बहुविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा, विद्यापीठ मुख्यालय), तृतीय क्रमांक (विभागून) - डॉ. शैलजा हासबे (वरिष्ठ शैक्षणिक संयोजक, नांदेड विभागीय केंद्र) व डॉ. पूनम वाघ (विद्यार्थी सेवा विभाग, विद्यापीठ मुख्यालय) यांनी मिळविला. उत्तेजनार्थ म्हणून मिलिंद देशपांडे, प्रकाश खनाळे (दोघेही संगणकशास्त्र विद्याशाखा, विद्यापीठ मुख्यालय), मीनल गोबरे (सहायक, आर. आर. लाहोटी महाविद्यालय अभ्यास केंद्र, मोशी, अमरावती व सविता पाटील (शैक्षणिक संयोजक, कोल्हापूर विभागीय केंद्र). या सर्व विजेत्या निबंध लेखकांना प्रमाणपत्रे व ग्रंथ पारितोषिके टपालद्वारे पाठविण्यात येणार आहेत. स्पर्धा समन्वयक म्हणून सेवांतर्गत प्रशिक्षण कक्षाचे प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी काम पाहिले. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेन्द्रसिंह बिसेन, विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्या डॉ. संजीवनी महाले, कुलसचिव दिलीप भरड, वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, परीक्षा नियंत्रक भटूप्रसाद पाटील यांच्यासह सर्व विद्याशाखा संचालक, विभागीय केंद्र संचालक व प्राध्यापक, अधिकारी, कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

सामना YCMOU PRO SMN P3 30.05.25

शुक्रवार, दि. ३० मे २०२५

## मुक्त विद्यापीठाच्या निबंध स्पर्धेत डॉ. सुधर्म हंडे प्रथम

नाशिक, दि. २९ (सा.वा.) - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील अध्यापक व कर्मचाऱ्यांसाठी 'मी आणि माझे सहकारी वृंद' या विषयावरील स्पर्धेत अमरावती केंद्राच्या डॉ. सुधर्म हंडे यांनी प्रथम क्रमांक मिळवला.

कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या सेवांतर्गत प्रशिक्षण कक्षाच्या वतीने 'कृपया वाचा आणि शिका' या प्रकल्पांतर्गत 'मी आणि माझे सहकारी वृंद' या विषयावर निबंध स्पर्धा पार पडली. अध्यापक वृंद व कर्मचाऱ्यांनी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. याचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. अमरावती विभागीय केंद्राअंतर्गत मोशीच्या आर. आर. लाहोटी महाविद्यालय येथील अभ्यासकेंद्र समन्वयक डॉ. सुधर्म हंडे यांनी प्रथम क्रमांक मिळविला. मुख्यालयातील बहुविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेतील डॉ. राजेंद्र बगाटे यांनी द्वितीय, तर नांदेड केंद्राच्या वरिष्ठ शैक्षणिक संयोजक डॉ. शैलजा हासबे आणि मुख्यालयातील विद्यार्थी सेवा विभागातील डॉ. पूनम वाघ यांनी विभागून तृतीय क्रमांक पटकावला. मिलिंद देशपांडे, प्रकाश खनाळे, मीनल गोबरे, सविता पाटील यांना उत्तेजनार्थ पारितोषिक जाहीर करण्यात आले. परिक्षक म्हणून कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख प्रा. दिलीप धोंडगे यांनी, तर समन्वयक म्हणून सेवांतर्गत प्रशिक्षण कक्षाचे प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी काम पाहिले.

DESHDOOT Times
....watching north maharashtra
YCMOU PRO DTTM P4 30.05.25
epaper.deshdoot.com
30 May 2025 - Page 4

# YCMOU invites proposals for new study centres

**NASHIK:** Yashwantrao Chavan Maharashtra Open University (YCMOU), an NAAC-accredited 'A' category university, is inviting online proposals for establishing new study centres offering seven courses in the faculty of education. Interested institutions, colleges, trusts, schools, voluntary organizations, and associations can apply through the university's official website by paying the prescribed fee. The last date to submit proposals is June 16, 2025. For detailed information and guidelines, interested parties are advised to visit the university website, appealed the university administration.

## कुजबुज

# तुमचा सहकारी कसा आहे मित्रांनो?




कामाच्या ठिकाणी कोणता सहकारी असेल हे सांगता येत नाही. मात्र, कर्मचाऱ्यांमध्ये सौहार्दपूर्ण वातावरण निर्माण करण्यासाठी मुक्त विद्यापीठाच्या कोणा 'पाईक' असलेल्याच्या मनात अभिनव कल्पना सुचली. मी आणि माझे सहकारी वृंद अशा अभिनव विषयाची निबंध स्पर्धाच विद्यापीठाकडून घेण्यात आली. आपले विद्यापीठ, आपले कुलगुरू असा कोणत्याही विषयावर निबंध लिहायला सांगितला असता तरी ते चांगलेच असाच निबंध लिहीतील ना? अकबर बिरबलाची गोष्ट आठवते का, दरबारातील प्रत्येकाच्या मनात आता या क्षणी काय चाललंय असे बिरबलाला विचारल्यानंतर त्यांनी खाविंदांचं आयुर्मान वाढावं, राज्याचा विस्तार व्हावा असे सांगितले, सर्वांनी त्याला माना डोलावल्या, खाविंद खुश तसाच हा निबंध स्पर्धेचा मुक्त प्रकार!

## प्रमाणपत्र नमुना :

ज्ञानगंगा घरोघरी

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**

(नॅक मानांकित 'अ' श्रेणी)

**सेवांतर्गत प्रशिक्षण कक्ष**

**मी आणि माझे सहकारीवृंद निबंध लेखन स्पर्धा**

**प्रमाणपत्र**


प्रमाणित करण्यात येते की. श्री./कु./सौ. ..............................


यांनी अभ्यासकेंद्र व विद्यापीठातील सर्व सहकारीवृंद / अध्ययनार्थी यांच्यासाठी आयोजित "मी आणि माझे सहकारीवृंद" निबंध लेखन स्पर्धेत प्रथम / द्वितीय / तृतीय / उत्तेजनार्थ / सक्रिय सहभाग दिल्याबद्दल त्यांना हे गुणवत्ता प्रमाणपत्र देण्यात येत आहे.


प्रा. विजयकुमार पाईकराव
प्रमुख सेवांतर्गत प्रशिक्षण कक्ष


श्री. दिलीप भरड
कुलसचिव


**ग्रंथ भेट दिली त्याची  मुखपृष्ठे :**







प्रा. विजय कुमार पाईकराव

प्रमुख, सेवांतर्गत प्रशिक्षण कक्ष

आणि कार्यकारी संपादक संवाद पत्रिका

मा. कुलगुरू